**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY**
(Formerly University of Pune)

**समन्वय कक्ष (माध्यम)** **Media Co-ordination Cell**
**गणेशखिंड, पुणे** Ganeshkhind, Pune-7

**27/10/2021**

## नव्या शैक्षणिक धोरणात मातृभाषेतील शिक्षणावर भर

### विनय सहस्त्रबुद्धे: विद्यापीठाकडून नव्या शैक्षणिक धोरणावर आधारित परिचर्चा व निबंध स्पर्धा

पुणे,दि.२५- शिक्षणाच्या बाबतीत देशाला वसाहतवादी मानसिकतेतून बाहेर येत स्वतःच्या देशाचा मातीचा सुगंध असणाऱ्या नव्या धोरणाची आवश्यकता होती. हा मूलभूत बदल नव्या शैक्षणिक धोरणात स्वीकारला असून मातृभाषेतील शिक्षणावर यामध्ये भर देण्यात आला असल्याची माहिती राज्यसभा खासदार व भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष विनय सहस्त्रबुद्धे यांनी दिली.



'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नवे शैक्षणिक धोरण २०२० अंमलबजावणी समिती' विद्यार्थी विकास मंडळ आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठस्तरीय खुल्या निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन व पारितोषिक वितरण समारंभ विद्यापीठातील संत ज्ञानेश्वर सभागृहात पार पडला यावेळी विनय सहस्त्रबुद्धे बोलत होते. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन.एस.उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, अधिष्ठाता

डॉ. मनोहर चासकर, डॉ. पराग काळकर, डॉ. संजीव सोनवणे, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेश पांडे, डॉ. संजय चाकणे, डॉ. सुधाकर जाधवर, अधिसभा सदस्य राजीव साबडे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. संतोष परचुरे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ.प्रभाकर देसाई आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

विनय सहस्त्रबुद्धे म्हणाले, भाषेचा आपल्या भावविश्वाशी आणि चिंतानाशी संबंध असतो, म्हणूनच मातृभाषेतील शिक्षणावर धोरणात भर देण्यात आला आहे. स्वदेशी, स्वभाषा, स्वभाव व स्वधर्म यांचा अंतर्भाव करून हे धोरण तयार करण्यात आले आहे.

यावेळी डॉ. नितीन करमळकर यांनी राष्ट्रीय शिक्षणाविषयी संकल्पना मांडली. पुण्यात राष्ट्रीय शिक्षणाची मुहूर्तमेढ दीडशे दोनशे वर्षापूर्वी मांडली आहे. या भारतीय ठेव्याची नव्याने मांडणी करण्याचा प्रयत्न आम्ही युनिव्हर्सलायझेशन ऑफ ट्रॅडिशनल इंडियन नॉलेज सिस्टीम (युटिक्स) या प्रकल्पाच्या माध्यमातून करत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

नव्या शैक्षणिक धोरण विषयक समितीतील सदस्य राजेश पांडे म्हणाले, लोकसहभाग वाढवा यासाठी अनेक वेगवेगळे प्रयोग करण्यात आले. निबंध स्पर्धेच्या माध्यमातून तीन ते चार हजार नागरिक यामध्ये सहभागी झाले आहेत. या स्पर्धेत ६५० जणांनी निबंध लिहिले असून प्रत्येक गटातील दहा निबंध निवडण्यात आले आहेत, असेही राजेश पांडे यांनी सांगितले.

-------